भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# न्यायाधीश (संरक्षण) अधिनियम, १९८५

**(सन १९८५ चा अधिनियम क्रमांक ५९)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Judges (Protection) Act, 1985

**(Act No. 59 of 1985)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ४.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि जजेस (प्रोटेक्शन) अॅक्ट, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ १७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Judges (Protection) Act, 1985 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on page 17.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# न्यायाधीश (संरक्षण) अधिनियम, १९८५

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नांव व विस्तार
२. व्याख्या.
३. न्यायाधीशांना अधिक संरक्षण.
४. व्यावृत्ती.

एच ४०७५—२ (१०३५—१—२००४)

# न्यायाधीश (संरक्षण) अधिनियम, १९८५

## ( १९८५ चा अधिनियम क्रमांक ५९)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[६ सप्टेंबर, १९८५]

**न्यायाधीश आणि न्यायिक कार्य करणारे इतर यांना अतिरिक्त संरक्षण मिळवून देण्यासाठी व त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या छत्तिसाव्या वर्षी संसदेकडून खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :---

१. (१) या अधिनियमास, न्यायाधीश (संरक्षण) अधिनियम, १९८५ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

२. या अधिनियमात, "न्यायाधीश" याचा अर्थ केवळ न्यायाधीश म्हणून अधिकृतरीत्या पदनिर्देशित केलेली व्यक्ती इतकाच नसून पुढील प्रत्येक व्यक्ती असाही आहे,--- व्याख्या.

(क) कोणत्याही विधिविषयक कार्यवाहीमध्ये कायद्याद्वारे अंतिम न्यायनिर्णय किंवा ज्या विरुद्ध अपील करण्यात आले नाही तर तो अंतिम असेल असा न्यायनिर्णय, अथवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडून पुष्टी देण्यास आल्यास अंतिम होईल असा न्यायनिर्णय देण्यास कायद्याद्वारे शक्ती प्रदान करण्यात आलेली व्यक्ती; अथवा

(ख) खंड (क) मध्ये उल्लेखिलेला असा न्यायनिर्णय देण्यास कायद्याद्वारे शक्ती प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तींच्या निकायामधील व्यक्तींपैकी एक व्यक्ती.

३. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणतेही न्यायालय, न्यायाधीश असेल अशा, अथवा होती अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, तिने तिचे पदीय वा न्यायिक कर्तव्य वा कार्य पार पाडताना, कार्य करताना वा करण्याचे अभिप्रेत असताना केलेली कोणतीही कृती वा गोष्ट अथवा उच्चारलेला शब्द यासाठी कोणतीही दिवाणी वा फौजदारी कार्यवाही दाखल करून घेणार नाही वा चालू ठेवणार नाही. न्यायाधीशांना अधिक संरक्षण.

(२) न्यायाधीश आहे किंवा होती अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये कार्यवाही (मग ती दिवाणी, फौजदारी वा विभागीय कार्यवाहीच्या रूपाने असो वा अन्य प्रकारे असो) करण्याच्या केंद्र सरकारच्या वा राज्य शासनाच्या वा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या वा कोणत्याही उच्च न्यायालयाच्या वा अन्य कोणत्याही प्राधिकरणाच्या शक्तीला पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही रीतीने प्रतिरोध केला जाणार नाही वा तीवर परिणाम होणार नाही.

४. या अधिनियमाचे उपबंध हे न्यायाधीशांना संरक्षण देण्याची तरतूद करणाऱ्या, त्या त्या काळात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या भरीला असतील, त्यांना न्यूनकारी म्हणून नसतील. व्यावृत्ती.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई